# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

## प्रेसनोट क्र.३९३ दिनांक १८/०४/२०२०

## दिनांक ३१/०३/२०२० ते १७/०४/२०२० रोजी पालघर जिल्हयात मनाई आदेशाचे भंग करणा-या वाहनचालकांवर ३८२ गुन्हे दाखल करुन ३५५२ वाहने जप्त

राज्य शासनाने कोरोना विषाणुचा (कोवीड-१९) चा प्रादुर्भाव रोकण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३/०३/२०२० रोजी पासुन लागु करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदी नुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे. कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोकण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा एक भाग म्हणुन जिल्हयाच्या कार्यक्षेत्रातील नागरीकांचे आगमन व प्रस्थान प्रतिबंधीत करणे आवश्यक आहे. त्याकरिता पालघर जिल्हयातील कार्यक्षत्रामध्ये फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४(१)(३) प्रमाणे मनाई आदेश पारीत करण्यात आले आहेत. त्याप्रमाणे मा. जिल्हाधिकारी पालघर यांचे कडील क्र. गृह/का.१/टे.३/मनाई आदेश/ एस.आर.१७/२० जिल्हादंडाधिकारी कार्यालय, पालघर यांचे कडील मनाई आदेश पारित झाले असुन सार्वजनिक काणत्याही रस्त्यावर सार्वजनिक वाहतुकीने रस्त्यावर, गल्लोगल्ली या ठिकाणी सायकल तसेच पारंपारीक व अपारंपारीक इंधनावर चालणा-या (गिअरसह/शिवाय), सर्व प्रकारच्या ३ चाकी वाहने, हलके वाहने, ॲप आधारीत ओला, उबर व तत्सम वाहने, मध्यम वजनाची वाहने यांचा प्रवास व वाहतुक यासाठी वापर करण्यास (रुग्णांची वाहतुक सोडुन) मनाई करण्यात आले आहेत.

पालघर जिल्हा पोलीस दलाकडुन सदर आदेशाची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केलेली आहे. **दिनांक १७/०४/२०२० रोजी मनाई आदेशाचे उल्लघंन करणा-या वाहन चालकांवर पालघर जिल्हयात एकुण ०९ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदर गुन्हयामध्ये एकुण ११५ वाहने जप्त करण्यात आले आहेत.**

| अ.क्र | पोलीस ठाणे | दाखल गुन्हे | जप्त वाहने |
|---|---|---|---|
| १ | माणिकपुर पोलीस ठाणे | ०२ | ४८ |
| २ | पालघर पोलीस ठाणे | ०१ | ०१ |
| ३ | वाडा पोलीस ठाणे | ०१ | ०८ |
| ४ | वसई पोलीस ठाणे | ०२ | ०५ |
| ५ | वालीव पोलीस ठाणे | ०३ | ११ |
| ६ | नालासोपारा पोलीस ठाणे | ०० | ४२ |
| एकुण | | ०९ | ११५ |

**मी गौरव सिंग, पोलीस अधीक्षक, पालघर, पालघर जिल्हयातील सर्व नागरीकांना आवाहन करतो प्रशासनाने दिलेल्या सुचनाचे नागरिकांनी तंतोतंत पालन करुन प्रशासनास सहकार्य करावे. अन्यथा आपणास सुध्दा अशा कारवाई सामोरे जावे लागेल.**

Scanned by CamScanner